जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ४९ वे ❖ अंक ७ वा ❖ मार्च २०१८ ❖ वीर संवत २५४४ ❖ विक्रम संवत २०७४

या अंकात पान नं.


- ।। जिनेश्वरी ।।
  अध्याय २३ – केशी गौतम १५
- सदुपयोग और दुरुपयोग ३१
- सुखी जीवन की चाँबिया – दोष त्याग
  १ – त्रि वर्ग बाधा त्याग ३५
  २– उपद्रवित स्थान का त्याग ३९
- कव्हर तपशील ४०
- विरासत हस्तांतरित करने के पाँच सूत्र ४३
- ऐसी हुई जब गुरुकृपा – एक लक्ष्य राख ४९
- चारित्र की शोभा – ज्ञान और सुध्यान ५१
- जरा सी चूक हुई नहीं कि पूरी
  फसल हो जाती बेकार ५४
- मृत्यु को महोत्सव बनाएँ –
  ऐसी दिल्लगी अच्छी नहीं ५५
- मोह छोडो सुखी रहो ५७
- हास्य जागृति ५९
- खाजगी सावकारी – कायदेशीर दृष्टीकोन ६१
- सफलता का शॉर्टकट – हौसला है
  दिल में तो डर किस बात का ७३
- महिलांनो कला जोपासा ८५
- जबकि ८६
- साँसों के समुद्र में डूबते जाएँ ८७
- डायमंड डायरी – • श्रध्दा • परोपकार ९१
  • प्रयत्न • साधेपणा ९२
- भगवती सूत्र व भगवद्गीता
  साम्यस्थळे व भेद ९३
- पहला बोल – गति चार ९४
- आनंदऋषिजी नेत्रालय, अहमदनगर ९५
- जैन सम्मेलन, दिल्ली ९६
- नाशिक जैन स्थानक संघात निवडणूक ९७
- गोम्मटेश बाहुबली की मूर्ति –
  माँ के संकल्प और सन्मान की प्रतिष्ठा ९९
- श्रवणबेळगोळ – रुग्णालय लोकार्पण १०१
- दीक्षा महोत्सव, पुणे १०२

- श्री सन्मती सेवा दल – गोल्डन बुक १०३
- नाशिक जिल्हा कला फाऊंडेशन १०४
- अरिहंत जागृति मंच, पुणे – निबंध स्पर्धा १०५
- JITo-JATF १०५
- श्रीमद् राजचंद्र डिवाईन टच पाठशाला १११
- सुर्यदत्त ग्रुप, पुणे – पुरस्कार वितरण ११२
- दीक्षा महोत्सव, केडगाव ११४
- ओम जय आनंद डायलेसिस सेंटर, थेरगाव ११५
- महावीर फूड बँक, पुणे ११६
- संचेती ट्रस्ट, पुणे ११७
- युगल धर्म, पुणे नि:शुल्क यात्रा ११८
- आदर्श विवाह आयोजन, पुणे १२०
- रत्न संदेश १२१
- श्री. सुरेशराव कोते – सत्कार १२४
- एच. एन. डी. जैन बोर्डींग, पुणे १२५
- विविध धार्मिक, सामाजिक व राजकिय बातम्या



जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० रु. |

या अंकाची किंमत ५० रुपये.

- www.jainjagruti.in
- www.facebook.com/jainjagrutimagazine

# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. • 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |

वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने /
RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA Branch : Market Yard, Pune 37.
Current A/c No. : 10521020146 IFS Code : SBIN0006117

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१, www.jainjagruti.in**
**Email : jainjagruti1969@gmail.com ● Press Email : prakash.offset@rediffmail.com**

## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९११९४०९
❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
❖ **सदाशिव पेठ परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
❖ **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२११३००५५९
❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
❖ **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१, मो. ९८८१४१४२१७
❖ **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३
❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०
❖ **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
❖ **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
❖ **श्रीरामपूर** –श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०
❖ **अमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
❖ **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२६९५४३३
❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

### तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.**

**भावानुवाद : साध्वी श्री ओजसदर्शनाजी म.सा., सौ. योगिता चंगेडे** *(क्रमशः)*

## अध्याय २३ – केशी गौतम

**'परंपरेच्या किंवा अनुभूतिच्या आधारावर**
**धर्माचा निर्णय होत नसतो,**
**धर्माचा निर्णय समीक्षप्रज्ञाने होत असतो.'**

**श्रध्देचा चंद्र व पुरूषार्थाचा सुर्य**

हा अध्याय आहे संभ्रमातून संवादाकडे, संवादातून समाधीकडे जाण्याचा, तेविसावे तीर्थंकर भ. पार्श्वनाथ परंपरेचे आचार्य केशीकुमार आणि चोविसावे तीर्थंकर भ. महावीरांचे ज्येष्ठतम व श्रेष्ठतम शिष्य इंद्रभूती गौतम यांच्यातील संवादाचे अमृत देणारा हा अमृतकलश.

केशीश्रमण एक अलौकिक व्यक्तिमत्व, अद्‌भुत वक्तृत्व, श्वेतांबिका नगरीचा राजा प्रदेशी ज्याला मिथ्यात्व प्रिय, हिंसा ज्याची पूजा, आतंक हा ज्याचा बाणा अशा क्रूरतेचे तांडव करणाऱ्या राजा प्रदेशीला करूणेच्या झऱ्यात बदलणारे, अहिंसक बनविण्याचे सामर्थ्य असणारे असे केशीश्रमण आचार्य, मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधी ज्ञान अशा तीन विशिष्ठ ज्ञानांचे अधिपति केशीश्रमण.

तर इंद्रभूती गौतम भ. महावीरांच्या पसायदानाचे अधिपती, द्वादश अंगांचे जाणकार.

तीर्थंकरांच्या तीर्थ शक्तीला जीवनात जिवंत करणारे असे हे दोन तीर्थकरांचे दोन उत्तराधिकारी जेव्हा भेटतात तेव्हा जिज्ञासांच्या समाधानाची यात्रा सुरू होते. अध्यात्मज्ञान, संन्यास, कुल अशा अनेक आधारांवर, प्रमाणावर ज्येष्ठ असणारे केशीश्रमण जेव्हा त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असणाऱ्या गौतम स्वामींना नमन-वंदन करतात. त्यांच्या प्रज्ञेची स्तुती करतात. तेव्हा अशा या अलौकिक कलशाची निर्मिती होते, तेव्हा एक आदर्श उदाहरण जनमानसा समोर प्रस्तुत होतो.

आपण सर्व मिळून आज ज्या अध्यायाचे पारायण करणार आहोत त्या अध्यायात संवादाची कला पहायला मिळणार आहे. कशा प्रकारे आपल्या संबंधातील अंतर, जवळीक साधू शकते. भेदापासून अभेदापर्यंतची साधना कशी सिद्ध करता येते ? कोणत्या पध्दतीने भविष्य आणि इतिहासाच्या गोष्टींना संगम-मीलनाचा स्वर निर्माण करता येतो ? पण हे सर्व तेव्हाच शक्य होऊ शकते जेव्हा प्रश्न विचारणारा केशीश्रमणासारखा आणि उत्तर देणारे इंद्रभूती गौतमांसारखे असतील.

ज्यावेळी मोठ्यांना लहानांचे मोठेपण समजेल आणि लहानांनासुद्धा मोठ्यांचे श्रेष्ठत्व उमजेल तशी दिव्य श्रद्धा आपसांत निर्माण होईल त्यावेळी सुंदर संवादाचा झरा वाहू लागतो. मोठ्यांचा लहानांवर विश्वास असेल आणि लहानांना वडीलधाऱ्याकडे जाण्याची मानसिकता असेल तेंव्हाच तेथे संगम-संवाद-समाधी निर्माण होऊ शकते.

चंद्र आणि सूर्य यांचा संवाद होणे, सुमेरूपर्वत आणि निषेध पर्वत यांच्यात चर्चा होणे हे भौतिकबाह्य क्षेत्रात अशक्य आहे. परंतु आध्यात्मिक जगात जेव्हा चंद्र आणि सूर्याचा संवाद, संभाषण, वार्तालाप होतो तेव्हा त्या संवादाचा प्रकाश शतकानुशतके या समस्त विश्वाला प्रकाशित-प्रज्वलित करीत असतो. श्रद्धेचा

चंद्र आणि पुरूषार्थाचा सूर्य अशा दोन अनुपम परंपरा स्वत:मध्ये धारण करून दोन तीर्थंकारांचे पुत्र हे त्या काळातील चंद्र आणि सूर्य होते. ते दोघे तीर्थंकराचे उत्तराधिकारीच नव्हते तर तीर्थंकराच्या श्रेष्ठतम शक्तीचे संवेदक आणि संवाहक पण होते. त्यांच्या वाणीत तीर्थंकर स्वत: जिवंत वाटत होते. त्या चंद्र-सूर्याचे नाव केशीश्रमण आणि इंद्रभूती गौतम.

**धर्म एकच व्यवस्था का दोन ?**

भगवान पार्श्वनाथानंतर २५० वर्षांनी भगवान महावीर झाले. भगवान महावीरांनी तत्कालीन परिस्थितीला अनुसरून व भव्यिकाळातील जाण ठेवून व्यवस्थेत, साधनेच्या मार्गात दृश्य आणि अदृश्य दोन्हींचे परिवर्तन केले. प्रत्यक्षात परिवर्तन आणले, अंतरंगातही परीवर्तन आणले.

भगवान पार्श्वनाथांची परंपरा असे मानत होती की धर्मप्राप्तीसाठी जीवनात समाधीचा अनुभव होण्यासाठी गणवेशाची मर्यादा आवश्यक नाही. कोणत्याही गणवेशातील परिणाम अवलंबीत नाही. शुभ्र वस्त्र घातले तर मन शुभ्र होईल, लाल कपडे घातले तर लाल होईल असं काही नाही. कपडे परिधान करण्याचा केवळ एवढाच हेतु होता की शरीराची निगा राखली जावी, शरीराला बाधा होऊ नये. जे मिळाले जसे मिळाले तसे परिधान करावे.

जेव्हा काटा टोचला लगेच काढून टाकावा, काटा रूतला नाहीत काढायचा विषयच नाही असेच अपराध झाला तरच प्रायश्चित घेतले. अपराध झाला नाही वर्षावर्षांपर्यंत प्रायश्चित घेतले जात नसे. परंतु परमात्मा प्रभु महावीरांनी साधनेत अंतर्बाह्य परिवर्तन दिले. चार महाव्रतांच्या ठिकाणी पाच महाव्रते दिली. सूर्योदय आणि सूर्यास्त प्रतिक्रमण-प्रायश्चित अनिवार्य केले. इच्छेचा प्रश्न ठेवला नाही.

दोन्ही तीर्थंकर सांगत आहेत धर्म एक आहे. मग दोघांच्या उपदेशात-प्रारूपात-आचरणात, व्यवस्थेत एवढे अंतर, एवढा फरक का ? भगवान पार्श्वनाथांच्या शिष्यांमध्ये आणि महावीरांच्या शिष्यांमध्ये हा संभ्रम निर्माण झाला, की दोन्ही तीर्थंकर प्रकाशाची चर्चा करतात मग हा मतभेदाचा अंधकार का ? ही भिन्नता का ?

**संभ्रमातून संवादाकडे**

हा मनाचा संभ्रम दूर करण्यासाठी इंद्रभूती गौतम आणि केशीश्रमण यांनी चिंतन केले. बंधुंनो, जे सुज्ञ असतात ते स्वत:चा संशय दूर करण्याचा प्रयत्न करतात आणि समस्त विश्वाला संशयमुक्त करतात. अज्ञानी-मूढ स्वत:च्या संशयाला सोडायला तयार नसतात. स्वत:च्या कु-धारणा, कदाग्रह, मिथ्याधारणा सोडत नाहीत. आणि लोकांमध्ये संशय निर्माण करण्याचे घोर पातक करतात. सुज्ञ लोकांची ओळखही आहे की जे संशयाचं मळभ दूर करतात आणि श्रद्धेचं मळवट मस्तकी लावतात. इंद्रभूती गौतम आणि केशीश्रमण यांनी निर्णय केला की प्रतिवाद करण्यापेक्षा संवाद साधावा. अधिकृत चर्चा करावी. अनधिकृत चर्चा टाळावी. समर्थ व्यक्ति जेव्हा श्रध्देने संवाद करतात तेव्हा त्या संवादातून सुधारस पाझरतो अमृत झिरपते आणि संशयग्रस्त व्यक्ती संवाद करतात तेव्हा विवादाचे विष प्रवाहित होते. विषाक्त विवाद आणतो विक्षिप्तता आणतो आणि विचक्षणता लोप पावते, एक श्रद्धावान आणि एक संशयग्रस्त अशा दोन व्यक्ति संवाद करण्याचा प्रयत्न करतील तर रावण सीतेचे हरण करेल. सीतेने लक्ष्मणरेषेच्या बाहेर पाऊल टाकले आणि रावण घेऊन गेला. पण सखोलतेने विचार केला तर लक्षात येईल की सीतेने केवळ लक्ष्मणरेषा ओलांडली असे नाही परंतु श्रद्धेच्या विश्वात जगणाऱ्यांशी संशयाने वागली. सीतेने लक्ष्मणावर संशय घेतला. त्या संशयाचे पडसाद सीतेच्या जीवनात उमटले सीतेसारख्या सतीवर धोब्याने संशय घेतला. स्वत: केलेल्या संशयाचा प्रतिध्वनी सीतेच्याच जीवनात उलटून आला. म्हणूनच भगवंत वारंवार सांगतात 'सद्धा परम दुल्लहा' श्रद्धामय

अंत:करण लाभणं अत्यंत दुर्लभ आहे. श्रद्धेचा संवाद समाधान देतो.

**अध्यात्मातील सूर्य आणि चंद्राची अलौकिक भेट**

इंद्रभूती गौतम आणि केशीश्रमण दोघेही परमात्म्या बाबतीत श्रद्धाशील आहेत. इंद्रभूती गौतम निघाले श्रावस्ती नगरीकडे. श्रावस्ती नगरीत कोष्ठक उद्यानात उतरले. दुसऱ्या तिन्दूक उद्यानात केशीश्रमण उतरले होते.

जेव्हा संशयाचे संबंध असतात तेव्हा संघर्ष निर्माण होतो. श्रद्धेचे संबंध संवाद निर्माण करतात. इंद्रभूती ज्येष्ठतेचा आदर करून, ज्येष्ठतेला अभिवादन करून जेथे केशीश्रमण होते तेथे जाण्यास निघाले, आपल्या समस्त संघासह कसे विलक्षण दृश्य असेल ते! आकाशातले चंद्र आणि सूर्य कधी भेटत नाही.

चंद्र जेव्हा सूर्याच्या छायेत जातो तेव्हा तिला अमावस्या म्हणतात. चंद्र सूर्यापासून जितका दूर जाईल त्याला पौर्णिमा म्हणतात. परंतु हे पृथ्वीवरचे तीर्थंकराचे पुत्र सूर्य आणि चंद्र एक-दुसऱ्यास भेटत आहेत त्याच्या मीलनाला आगमकरांनी शब्द प्रयोग केला आहे. 'चंदसूरसमप्पभा'

**श्रद्धेच्या दोन अमृतसागरांचा संगम**

निघाले इंद्रभूती गौतम. केशीश्रमणांना माहीत झाले की इंद्रभूती गौतम येत आहेत. यमुनेला कळले गंगा येत आहे. तुम्ही कधी अनुभवला आहे हा संगम! कशी यमुनासुद्धा गंगेला भेटण्यास धावत येते. जे हृदय भेटायला येणाऱ्यासाठी भेटायला पाऊल उचलत नाही ते हृदय पाषाणाचे असते. पाषाणात गती कशी असणार? पाषाण आलेल्याचे स्वागत करीत नाही. फक्त ठेच लावतो. फोडायचे काम करतो. इंद्रभूती आणि केशीश्रमण दोघांच्या हृदयात श्रद्धेचा सागर उसळत होता. केशीश्रमणही भेटण्यासाठी उत्सुक होते. तेही पुढे स्वागत करण्यासाठी गेले. भावपूर्ण स्वागत केलं, श्रेष्ठ पंच आसन प्रदान केले आणि सुरू झाली संवादपूर्ण समाधनाची यात्रा.

केशीश्रमण मोठे आहेत व त्यांना इंद्रभूतींना प्रश्न विचारायचे आहेत. मोठ्यांनी मोठेपण ठेवून लहानांना कसे प्रश्न विचारावे याचे प्रात्याक्षिक आहे या अध्यायात ते असे म्हणाले नाही की, ''तुमचे बोलणे माझ्या लक्षात येत नाही वगैरे...'' अपितु ते मोठ्या आत्मभावाने इंद्रभूती गौतमांना म्हणाले ''ही दोन प्रकारची धर्मव्यवस्था पाहून तुमच्या मनात विचार येत नाही का ! मला तर विचार येतात त्या संशयाचे तुम्ही समाधान करावे असे मला वाटते.'' अशी रीत असते लहानांना प्रश्न विचारण्याची.

जर तुम्ही तुमचे मोठेपण बाजूला ठेऊन लहानांना प्रश्न विचाराल तर ते लहान कधीच मोठ्यांचा अपमान करण्याचे दु:साहस करू शकणार नाही. पण मोठे जेव्हा 'लहान' होऊन प्रश्न विचारतात तेंव्हा उत्तर समाधानकारक मिळत नाही.

केशीश्रमण इंद्रभूतींना म्हणाले, ''तुमची इच्छा असेल तर माझे समाधान करावे'' आणि केशीश्रमण एकेक जिज्ञासा मांडत गेले व इंद्रभूती समाधानाची यात्रा करत गेले. एक अशा समाधानाची यात्रा जी युगायुगांपर्यंत अनेक भक्तजनांना, जिज्ञासूंना समाधान देत राहील. जन्मोजन्मी साधकांना सिद्धीच्या शिखरावर पोहचवेल. संवादाचे संगीत व समाधानाचे अमृत संशयाच्या व्याधीपासून मुक्त करेल.

दोघेही स्थानापन्न झाले दोघांच्या साधू समूहाने एकमेकांना जवळून पाहिले. मनात वितर्क निर्माण झाले. एकच कार्य हाती घेऊन, एकच उदिष्ट ठेवून संपूर्ण ज्ञानींच्या द्वारे दोन व्यवस्था का दिल्या गेल्या ? काय कारण असावे याचे ? 'विसेसे किं नु कारणं ?' विचार करण्याची एक पध्दत असते. 'विशेष' असेल तर काही ना काही कारण असेल हे समजून घेण्याची वृत्ती असते. साधु समूहांच्या मनात चाललेले चिंतन दोन्ही महापुरूषांनी जाणले.

केशीश्रमण विचारात गेले व समाधनाचे अमृत प्राप्त करीत गेले. आपणही खूप सजगतेने, जागृतपणे

यात्रा करूया. खूप श्रद्धेने गायन, संभाषण चालेल त्यात चिंब भिजून जाऊया. यासाठी आकंठ बुडायला हवे की जीवनात तेव्हा अशी घटना घडेल, संधी मिळेल तेव्हा आपण केशीश्रमण आणि इंद्रभूतीच बनले पाहिजे. असे दिव्य स्वप्न उराशी बाळगा की भगवंता माझ्यापासून समाधानाचा सुधारसच प्रवाहित व्हावा, संवादाचे संगीत पाझरावे, संशयाचे विष व्यापू नये म्हणून श्रद्धापूर्वक पारायण करावे. आपल्या घरात कुटुंबात, समाजात श्रद्धेचे संबंध प्रस्थापित करावयाचे असतील तर या अध्यायात त्याचा मंत्र ... त्याची गाथा दडलेली आहे, सामावलेली आहे.

**पडिरूवं पडिवत्तिं**

केशीश्रमण त्यांच्या बरोबर येथे 'जहारूवं' शब्द दिलेला नाही. येथे असेही म्हणणे शक्य होते 'जहारूवं' शब्द 'जहावत्ती सम्मं संपडीवज्जई' अर्थात् जसा होता तसा व्यवहार केला. समोर कुत्रा आला भाकरी टाकली, समोर गाय आली तोंडात भाकरी दिली, समोर संत आलेत उठून वंदन करून अहोभावाने दिले याला म्हणतात 'यथारूप' ज्याला आपल्या भाषेत म्हणतात चेहरा पाहून टिळा लावणे त्याला म्हणतात 'जहारूवं' आणि येथे शब्द दिला आहे. 'पडिरूवं पडिवत्तिं' अर्थात भगवंताला नैवेद्य द्यायचा तर कोरडी भाकरी देणार नाही तूप लावून देईन. तशीच कुत्र्यालाही तूप लावून भाकरी देणारे संत नामदेव त्याच्यामागे धावले की ''भगवंता ती भाकरी कोरडी आहे तूप लावून घ्या.'' याला म्हणतात 'पडिरूवं पडिवत्तिं.'

संत एकनाथ कावड घेऊन जात होते. पाणी देवाचरणी अर्पण करायला सर्वजण कावडीमध्ये पाणी घेऊन जात होते. सर्वांनी पाहिले एक गाढव तहानेने व्याकुळ झालेले आहे, परंतु कोणीही त्याला पाणी पाजले नाही. एकनाथांनी करूणेने-भक्तिने त्या गाढवाला पाणी पाजले ते गाढवाला नव्हे थेट देवाचरणी पोहोचले. याला म्हणतात 'पडिरूवं पडिवत्तिं.'

समोरचा कसा आहे, कसा वागतो आहे त्यानुसार मी व्यवहार करणार नाही, तर मी जसा आहे तसा मी व्यवहार करीन. माझ्या अंतरंगातील श्रेष्ठतेनुसार व्यवहार करीन. याला म्हणतात 'पडिरूवं पडिवत्तिं.'

सून चांगली वागत नाही तर मी का चांगली वागू? अरे ती तर सून आहे, तू सासू आहेस ना ? तुझे मोठेपण तू ठेव. तू जशी माझ्याबरोबर राहशील तशी मी तुझ्याबरोबर राहीन याला म्हणतात 'जहारूवं जहावत्ती' व आपल्या श्रेष्ठतेनुसार वर्तन करणे म्हणजे 'पडिरूवं पडिवत्तिं' असो.. जेव्हा दोन महापुरूषाचे मीलन-संवाद सुरू झाले तेव्हा तिथे देव, गंधर्व, यक्ष, व्यंतर, किन्नर जे दृश्य होते ते आले व काही अदृश्य रूपात ही आले.

**संवादाची कला**

केशीश्रमण यांनी इंद्रभूती गौतमाला म्हटले ''पुच्छामि ते महाभाग - अहो महाभाग्यशाली ! मी तुम्हाला प्रश्न विचारू इच्छितो.'' इंद्रभूती गौतम म्हणाले ''जशी आपली इच्छा असेल आपण विचारू शकता.'' जेव्हा अशी अनुज्ञा घेतली जाते तेव्हा समोरच्या व्यक्तीची उत्तर देण्याची मानसिक तयारी आहे की नाही हे समजते.

आजकाल मोठी माणसं तक्रार करतात की लहान मुलं उलट उत्तरे देतात. परंतु तुम्ही त्यांना कधी विचारता का, की उत्तर देण्याची त्याची इच्छा आहे की नाही ? तू कोठे आहेस ? कसा आहेस ? काय करतो आहेस? हे विचारण्यापूर्वी एवढे तरी विचारा की ''मला तुझ्याशी बोलण्याची इच्छा आहे. तू ऐकण्याच्या मन:स्थितीत आहेस का ? या पद्धतीने वागलात तर घरात भांडणे, चिडणे बंद होऊन जाईल आणि जेव्हा इंद्रभूतींकडून अनुज्ञा मिळते तेव्हा केशीश्रमण पहिला प्रश्न विचारता. ''परमात्मा प्रभूमहावीरांच्या विषयी भगवान पार्श्वनाथ सांगतात की माझ्याप्रमाणेच तीर्थंकर भगवान महावीर होतील. भगवान महावीरही सांगतात की भगवान तीर्थंकर होऊन गेले. दोघेही तीर्थंकर आहेत, ज्ञानी आहेत, दोघांचे उद्दिष्ठ एक आहे विश्वाला तीर्थ बनवण्याचे मग

दोन प्रकारचा उपदेश का ? भगवान पार्श्वनाथांनी चार महाव्रत सांगितली, महावीरांनी पाच महाव्रते दिली असे का ? आपल्या मनात ही असे येते का ?'' तेव्हा इंद्रभूती गौतमांनी उत्तर दिले.

चाऊज्जामो य जो धम्मो, जो इमो पंचसिक्खिओ।

देसिओ वध्दमाणेण, पासेण य महामुणी ।।

परंपरेच्या आधारावर धर्माचा निर्णय होत नसतो, अनुभूतीच्या आधारे धर्माचा निर्णय होत नसतो. धर्माचा निर्णय करायचा असेल तर तो प्रज्ञेच्या आधारावर, प्रज्ञेनं समीक्षा करून होत असतो. यासाठी ज्याला धर्म द्यायचा, उपचार करायचा, इलाज करायचा तो जसा तसा इलाज करावा लागेल. जसे लहान मुलांना गोळी द्यायची असेल तर गोळी तीच, औषध तेच फक्त मात्रा कमी असते. म्हातारा किंवा तरूणाला गोळी द्यायचे प्रमाण भिन्न असते.

**पंचमहाव्रताची समीक्षा**

इंद्रभूती गौतम म्हणाले १) भगवान ऋषभदेवांच्या काळात जे लोक होते ते मूढ पण सरळ होते समजावून सांगणे अवघड होते पण त्यांच्याकडून पालन करून घेणे सोपे होते. २) भगवान अजितनाथांपासून भगवान पार्श्वनाथांपर्यंत जो संघ लाभला ते प्राज्ञ व सरळ होते त्यांची मानसिकता होती त्यांना समजावून सांगणे सोपे होते, त्यांच्याकडून पालन करून घेणेही सोपे होते. ३) भगवान महावीरांच्या काळातील लोक वक्र व जड होते. त्यांची मानसिकता अशी होती की त्यांना समाजवणेही अवघड, त्यांच्याकडून पालन करून घेणेही अवघडच. ही भिन्न प्रकारची जनमानस आहेत म्हणुन दोन प्रकारे व्यवस्था केली गेली आहे. प्रथम लोक सरळ पण सुज्ञ नव्हते. समज कमीच असायची भगवान महावीरांच्या समयी जनमानस 'वक्रजड' अर्थात समजतही नव्हते, ढळतही नव्हते-वळतही नव्हते. ज्यांना समजत नाही पण समजण्याचा भाव आणून जगतात अशा लोकांना मोक्षमार्गावर आणण्यासाठी भगवंतांनी ही व्यवस्था दिली.

**धर्मसाधनांची गरज**

केशीश्रमणांनी पुन्हा विचारले ठीक आहे समजावण्याची, आचरण करण्याची गोष्ट होती तो पर्यंत साधनेच्या क्षेत्रात औषधांच्या स्वरूपात, मात्रेत, स्वभावप्रवृत्तीत बदल करणे ही गोष्ट लक्षात येते. परंतु आवरण का बदलले ?

एगकज्जपवन्नाणं, विसेसे किं नु कारणं ।

लिंगे दुविहे मेहावी ! कहं विप्पच्चओ न ते ।।

भगवान महावीरांनी साधूंसाठी वस्त्रांचा नियम केला कमीत कमी वस्त्र परिधान करावे, केले तरी शुभ्र वस्त्रच धारण करावे आणि भगवान पार्श्वनाथांचे संत सर्व प्रकारचे, रंगाचे परिधान करतात. हे कपड्यांबाबत भिन्न नियम का ? औषध बदलले ठीक आहे पण बाटली किंवा आवरण बदलण्याचे काय कारण ? इंद्रभूती गौतमांनी उत्तर दिले 'विन्नानेण समागम्म, धम्मसाहणमिच्छियं' अर्थात् विज्ञानाशी सहमत होऊन धर्मसाधनेचाच नाही तर धर्मसाधनांचाही विचार केला गेला आहे. लोकांना अनुभव येण्यासाठी, प्रचीती येण्यासाठी जसे गणवेशाची सक्ती केली. लोकांना जाण असावी व स्वत:लाही भान असावे यासाठी गणवेशाची परंपरा.

बंधुंनो नवकार कलश धर्मसाधन आहे. गळ्यात धारण केलेले अर्हम् धर्मसाधन आहे. तुम्ही जैन आहात याचा लोकांना अनुभव येण्यासाठी. लोकांमध्ये अनेक प्रकारचे विकल्प असतात त्यांना विराम देण्यासाठी व्यवस्था ठेवली पाहीजे स्वत:ला स्वत:ची जाण कायम होत रहावी मी कोण आहे ? काय करीत आहे ? याची जाणीव आपणास रहावी म्हणून ही व्यवस्था आहे. प्रसन्नचंद्र राजाच्या जीवनाचा प्रसंग आहे की प्रसन्नचंद्र राजर्षि राज्यत्याग करून श्रमण बनले. ध्यानसाधनेसाठी उभे होते. तेथून दोन सैनिक जात होते. जाता जाता एकजण दुसऱ्याला बोलला की ''हा काय मूर्खपणा ? लहान मुलाला राजसिंहासनावर बसवून संन्यासी बनला. आता राज्यावर आक्रमण झाले तर मग राज्य कोण सांभाळणार ?

प्रसन्नचंद्र राजाने हे ऐकले. त्याच्या अंतर्मनात युद्ध सुरू झाले. युद्धाचे भाव भीतीमध्ये, भयंकरते मध्ये गेले आणि नरकगती संभावित झाली. युद्ध करत राहिले मनानेच आणि समोरच्या व्यक्तिवर प्रहार करण्यासाठी कोणतेही शस्त्र शिल्लक राहिले नाही म्हणून स्वत:चा मुकुटच फेकून मारावा म्हणून हात उचलला, मस्तकाकडे गेला आणि जाणवलं की ''अरे ! माझ्या मस्तकावर तर मुकुट नाहीच. मुंडण आहे. मी राजा नाही, श्रमण आहे.''

मुहपत्ती, रजोहरण हे धर्मसाधन आहे स्वत:ला स्मरण करण्यासाठी आणि दुसऱ्यांना प्रचीती अनुभूती देण्यासाठी शेवटचे शब्द स्पष्ट आहेत 'लोगे लिंगपओयणं' जगात प्रतीकांचा हेतू असतो. जैनप्रतीकाचा हेतू असतो मुहपती, अर्हम् तुमचे जैनत्व जागवण्यासाठी.

व्यवस्थेबाबत हे दोन प्रश्न होते. पुढे जी जिज्ञासेची यात्रा आहे, जी चर्चा आहे ती गहन आहे, शाश्वत आहे. आंतरिक जीवनाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. पुढील सर्व प्रश्न संप्रदाय, व्यवस्थेबाबत नसून प्रत्येक मनुष्याच्या जिवंत समस्यांबाबत आहेत.

**आत्मा-विजेता बना**

इंद्रभूतींना केशीश्रमणांनी विचारले ''लाखो लोकांमध्ये तुम्ही राहता. प्रत्येक व्यक्ति तुम्हाला पराजित करू पाहते, वश करण्यासाठी प्रयत्नशील आहे. एखादा शत्रू असेल तर त्याला समजू शकतो पण येथे लाखो शत्रू आहेत. ते सर्व तुम्हाला पराजित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण मी पहात आहे तुम्ही कोणाकडूनही पराजित होत नाही. हे तुम्हाला कसे शक्य झाले ?''

याचे उत्तर देताना इंद्रभूती गौतम म्हणाले..

एगे जिए जिया पंच, पंच जिए जिया दस ।
दसहा उ जिणित्ताणं, सव्वसत्तू जिणामहं ।।

प्रथम मी एकाला जिंकले, मी एकाला जिकल्यावर पांच आपोआपच जिंकले गेले. पांच जिंकले त्यानंतर दहासुध्दा सहज जिंकता आले आणि जेव्हा मी दहांना जिंकले त्यानंतर बाकी सर्व शत्रू लगोलग जिंकले गेले.

हा क्रमच आहे. एक...पाच...दहा...सर्व. आपण स्वत:ला जिंकले, मग परिवार नंतर संपूर्ण गल्ली.. नंतर संपूर्ण शहर काबीज करता येते. आधीच सर्वांना कबज्यात घेण्याचा प्रयत्न कराल तर हातातून सर्वच निसटून जाईल.

केशीश्रमणांनी विचारले ''एक जिंकले पण एक म्हणजे काय ? कोण एक आहे ज्याला जिंकायचे आहे ? शत्रू कोणाला म्हणता आहात ?'' इंद्रभूती गौतम म्हणतात ''एक न जिंकलेले आत्मा हाच शत्रू आहे. त्यानंतर चार कषाय व पाचही इंद्रिये शत्रू आहेत. प्रथम आत्म्याला जिंका व नंतर क्रमाने सर्व जिंका'' बंधूंनो ! तीर्थंकराच्या साधना पद्धतीत आणि इतर साधना विधीत फरक आहे. ते कसे हे लक्षात घ्या. बाकी सर्व साधना पद्धतीत दहा प्राणांना जिंकायला सांगतात, पांच इंद्रियांना जिंकायला सांगितले जाते, देहावर विजय प्राप्त करण्याचे विधान केले जाते परंतु इंद्रभूती गौतम म्हणतात की 'प्रथमत: आत्म्याला जिंकून घ्या बाकी सर्व आपोआप जिंकले जातील. आपल्या जीवनाचा राजा आपला आत्मा

'एगप्पा अजिए सत्तू, कसाया इंदियाणि य ।
ते जिणित्तु जहानायं, विहरामि अहं मुणी ।।

आणि आपला आत्मा जेव्हा पराजित होतो तेव्हा इंद्रिये आत्म्याविरूद्ध बंड पुकारतात, मनही विरूद्ध दिशेने गती करू लागते.मग आपणच विचार करावा की राजा जर पराजित झाला तर प्रजा किती काळ दम धरेल ? ती हारणारच म्हणूनच तीर्थंकर सांगतात 'हा क्रमच अनुसरावा. एक आत्म्याला जिंकले की सर्वांना जिंकले समजावे.'

**पाशामुळे पशुवत जीवन**

पुढचा प्रश्न विचारला की ''समस्त विश्वातील असंख्य जनसमुदाय पशूप्रमाणे जगत आहेत, पण मी

पहात आहे की आपण सर्व पाशातून मुक्त आहात, सर्व मायाजाळातून स्वतंत्र आहात मला अगदी विचारावेसे वाटते की काय आपण त्या मायाजाळात अडकत नाही ? पाशात अडकला नाही ? अशी आपल्याजवळ कोणती उत्कृष्ट कला आहे ? कसे आपण या जंजाळातून मुक्त झालात ? आपण सर्वप्रथम आम्हाला हे समजवण्याची तसदी घ्यावी की पाश म्हणजे काय ? ते कसे तोडावे ?

प्रश्न मनात निर्माण होतो की पशू कुणास म्हणावे ज्यांना बांधून ठेवतात की जे स्वत: बंदिस्त होऊन जातात त्यांना ? 'पासबद्धा सरीरिणो' - जे शरीराच्या पाशात बद्ध आहेत, वासनेत गुरफटले गेले आहेत स्वत;च्या पाशात बंदिस्त होऊन लोक पशुवत जगतात.

इंद्रभुती गौतम म्हणाले - ''लक्ष देऊन ऐका. पाश-बंधने दोन प्रकारची असतात. १) द्वेष २) राग, प्रेम आणि द्वेष एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपल्या स्वत:च्या मन:स्थितीवर जेव्हा निर्णय प्रक्रिया चालते प्रेम व द्वेषाचा दुर्देवी खेळ चालतो. माझ्या अनुकूल ते चांगले, माझ्या प्रतिकूल ते वाईट. ही अनुभूति-विचारसरणी-प्रेम-द्वेषाचे नियंत्रण गतिशील करते वैयक्तिक तात्कालिक अनुकुलता-प्रतिकूलतेच्या द्वंद्वाला छेदून निर्द्वंद्वमनाने-जे घडत आहे त्यामध्ये दिव्यत्वाची साधना, वा त्यामधून स्वत:चा ध्येयप्राप्तीचा मार्ग विनासंघर्ष शोधूण, शोधलेल्या मार्गावर चालणं याला श्रद्धा म्हणतात ! प्रेम व द्वेषांच्या कर्दम द्वंद्वातून जेव्हा निर्द्वंद्वतेतच कमळ विकसित होतं-तेव्हा मन व जीवन पाशमुक्त होतं कोणाची वाईट गोष्ट चांगली वाटते याला प्रेम म्हणतात. चांगली गोष्ट योग्य वाटते, वाईट गोष्टही योग्य वाटते याला श्रद्धा म्हणतात. चांगली गोष्ट पण वाईटच वाटते याला द्वेष म्हणतात.

गौतम म्हणतात श्रद्धाशील व्हा, श्रद्धामय हृदय बनवा तर पाशमुक्त व्हाल. मी या सर्व पाशांतून मुक्त झालो आहे, कारण हे पाश अत्यंत भयंकर आहेत. नेह पासा भयंकरा... जरा सखोलपणाने विचार केला तर आपल्या लक्षात येईल आपल्याला प्रिय व्यक्ति जास्त दु:ख देते की, अप्रिय व्यक्ति जास्त दु:ख देते? प्रिय व्यक्ति असली तरी दु:खच होते, गेली तरी दु:खच देते. मला ही भयंकरता जाणवली म्हणूनच मी त्या पाशातून मुक्त झालो.

**तृष्णालता**

केशीश्रमण इंद्रभूती गौतमांना विचारीत आहेत ''हे गौतमा ! मी जाणतो की अशी एक वेळ जी अंत:करणातून उगवते व जिला विषारी फळे येतात ती तू का उपटून टाकलीस ? ती वेळ कोणती आहे ?'' इंद्रभूती गौतम सांगतात ''जीवनाचा लोभ ही विषारी फळ निर्माण करणारी भयंकर वेल आहे. आणि या वेलीला मी मूळापासूनच उपटून टाकले आहे. त्यामुळे तिच्यापासून निर्माण होणाऱ्या विषारी फळांपासून मी स्वत:ला सुरक्षित ठेवू शकलो.''

बंधूंनो, दुसऱ्याच्या हृदयातील विषारी फळे आपल्याला खावी लागत नाहीत परंतु आपल्याच हृदयातून जन्मलेल्या वेलीच्या विषारी फळांना खाण्यावाचून पर्याय नसतो. स्वत:च्या अंतरंगातील लालसा, लोभ, संसाराची तृष्णा जीवनात विषारी परिणाम भोगायला भाग पाडतो. या वेलीला मुळापासून उपटले तरच तिची पुनरावृत्ती होत नाही.

**कषायाग्नी**

गौतममुनींना धन्यवाद देत केशीश्रमण पुढची जिज्ञासा ठेवत आहेत ''या वेलीला उपटणे सोपे आहे पण या अंतरंगात जी आग भडकलेली आहे तिला तुम्ही कसे शांत केले ?'' इथे केशीश्रमण बाहेरच्या अग्नीबद्दल बोलत नाहीत कारण बाहेरची आग शरीराला, घराला, कपड्यांना, जाळू शकते पण आत्म्याला जाळू शकत नाही. आत्म्याला जाळते ती अंतरंगातील आग. इंद्रभूति गौतम शंका समाधान करतात' हे श्रमणेश्वर, एका महामेघाचा वर्षाव होतो या महामेघाच्या सर्वश्रेष्ठ जल राशीला मी ग्रहण केले आहे व त्यामुळे माझ्या अंतरंगातील आग विझली, समाप्त झाली.''

**प्रभुवाणीचा महिमा**

केशीश्रमण विचारतात ''तो कोणता अग्नी आहे? तो महामेघ कोणता आहे ? त्या जलराशी कोणत्या आहेत ?'' त्यावर इंद्रभूती गौतम सांगतात ''क्रोध, मान, माया, लोभ हे अंतरंगात निर्माण झालेले कषायच अग्नी आहेत व तीर्थंकर प्रभुरूपी महामेघातून वर्षाव होत असलेल्या श्रुतज्ञानरूपी जलधारांच्या वर्षावामुळे कषायांचा अग्नी शांत झाला आहे. प्रभूंचे वचन, प्रभुवाणी हीच थंड निर्मळ जलधारा आहे व या जलधारेच्या निरंतर वर्षावामुळे मला कषायाच्या अग्निज्वाळा जाळीत नाहीत.'

बंधूंनो, याच्या जिवंत उदाहरणाचा मी साक्षी आहे. एकदा लुधियाना चातुर्मासात-मेरठमधे चातुर्मास चाललेल्या एका संतांच निरोप आला भोलेबाबा पू. श्री रतनमुनीजी म.सा.ना.की ''आम्हाला उपद्रवास तोंड द्यावे लागत आहे मार्ग काढा.''

मी कुतूहलपूर्वक भालेबाबांना विचारले की ''आता काय उपाय द्याल ?'' बाबा म्हणाले ''काही नाही रे, फक्त मी वीरत्थुईच्या पाठाची आराधना इथे करणार व ती अक्षरे तीथं सिंचित होत आहेत असं ध्यान करीन.'' आणि खरोखरचं त्यांनी वीरत्थुईची आराधना इकडे केली व तिकडे त्या संतांना उपद्रव होणे बंद झाले. काही तंत्र, मंत्र नाही, चेटके-टोटके नाही केवळ श्रुतदेवाच्या जलधारेचा वर्षाव आणि सगळे शांत.

**मन-उच्छृंखल घोडा**

केशीश्रमण गौतमांना विचारतात ''हे गौतम ! मी पाहतो आहे लोकांना की त्यांना जायचे एकीकडे असते पण जातात दुसरीकडे. परंतु तुम्ही मात्र तुम्हाला जिथे जायचे आहे तिथेच जाता. हा तुमच्या अंतरंगातील उच्छृंखल भयंकर, दुष्ट घोडा बरोबर मार्गावरून कसा चालतो आहे ? बाकी सर्वांचे घोडे जिथे धावतील तिथे स्वत:ला जावे लागते आहे आणि तुमचा घोडा मात्र तुम्हाला जायचे आहे तिथे तुला घेऊन जातो. तुम्ही कसे या घोड्याला नियंत्रित करता ?'' तेव्हा इंद्रभूती गौतम म्हणतात ''मी या मनाच्या घोड्याला धर्मशिक्षारूपी लगामाने प्रतिबंधित, नियंत्रित केले आहे त्यामुळे तो वाकड्या मार्गाने न जाता माझ्या इच्छित मार्गावरच धावतो.

**जिनेश्वरचा मार्ग-सन्मार्ग**

इंद्रभूती गौतमाला धन्यवाद देत केशीश्रमण पुढे विचारतात ''या जगात एवढे मार्ग आहेत की ओळखणे कठीण आहे की कोणता सन्मार्ग आहे व कोणता विषममार्ग ? कोणता बरोबर आहे व कोणता चुकीचा? पण तुम्ही मात्र भटकत-भरकटत नाही. तुम्ही बरोबर मार्ग कसा ओळखता ? ''इंद्रभूती गौतम म्हणतात ''मी चुकीचा किंवा बरोबर मार्ग, सन्मार्ग, उन्मार्गही जाणतो आहे'' त्यांना ओळखण्याची कसोटी लक्षपूर्वक ऐका ''जेवढे कुप्रवचने आहेत, जी प्रवचने हिंसेचा, क्रूरतेचा आरंभ-समारंभाचा, असत्याचा, चोरीचा उपदेश देतात अशी प्रवचने-कुप्रवचने हे सर्व कुमार्ग. एकमात्र जिनेश्वराचा मार्ग सन्मार्ग आहे. मी नेहमी माझ्या प्रभूंनी दिलेल्या मार्गावर चालतो त्यामुळे भटकण्याचा प्रश्नच येत नाही.''

**धर्मरूपी बेट**

केशी श्रमण वात्सल्याभावाने पुढील जिज्ञासा मांडीत आहेत, ''हे गौतमा पाण्याच्या मोठ्या प्रवाहाने खूप जीव वाहून, बुडून जात आहेत त्या जीवांना शरण, आश्रय, आधाराचे ठिकाण कोणते आहे ? ते द्विप, ते बेट कोणते आहे ज्याच्यावर हे जीव सुरक्षित राहू शकतात ?'' गौतममुनी सांगतात ''संसाररूपी सागरात म्हातारपण व मरणाच्या प्रवाहाने वहात जाणाऱ्या जीवांना धर्मरूपी बेट हाच आधार, गती व शरण आहे. कसलेही वादळ येवो, केवढाही पूर येवो, त्सुनामी येवो जे या धर्मरूपी बेटाच्या शरणात असतात त्यांना कुठलेही वादळ किंवा पूर बुडवू शकत नाही.''

**शरीर नौका आत्मा नाविक**

केशीश्रमण पुढे विचारतात ''हे मुनिवर ! मी

पाहतो आहे या भयानक सागरात तुम्ही नौकेत विराजमान आहात. परंतु या भयानक महाप्रवाहाच्या समुद्रात साऱ्या नौका विपरीत दिशेने जाताना मी पाहतोय. तुमची नौका कशी काय पार करु शकाल? ती मधेच बुडणार नाही याची खात्री काय ? इंद्रभूती गौतम सांगतात ''उत्तमप्रकारे जाणतो की ज्या नौकेला छिद्र असते तीच नौका बुडते. पण ज्या नौकेला छिद्र नाही तीच नाव तीरावर पोहोचते.''

केशीश्रमण विचारतात ''कोणत्या प्रकारची नौका आहे ती ?'' यावर इंद्रभूती गौतम सांगतात ''माझे शरीरच माझी नौका आहे व माझा जीव, माझा आत्मा तिचा नाविक आहे. ज्या शरीराला आत्मा वल्हवीत आहे ते शरीर सर्वश्रेष्ठ ध्येय गाठल्याशिवाय रहात नाही.''

परिवार असो, समाज असो, देश असो ज्या व्यवस्थेत छिद्र राहिले त्या व्यवस्था बुडायला वेळ लागत नाही. छिद्ररहित व्यवस्था समाज परिवाराला तारून नेते.

**तीर्थंकर सुर्य**

केशीश्रमण पुढील जिज्ञासा प्रकट करीत आहेत ''गौतम ! खूप भयानक, काळाकुट्ट, दाट अंधार पसरलेला असून लोक त्यात पडतात-झडतात, ठेचाळताहेत. हा अंधार कोण दूर करेल ?'' इंद्रभूतीगौतम म्हणतात ''सूर्याचा उदय झालेला आहे व त्याचा प्रकाश हा अंधार दूर करेल.'' केशीश्रमण विचारतात ''तो सूर्य कोणता आहे हे सांगण्याचीही कृपा करावी.'' इंद्रभूती गौतम स्पष्टीकरण देत आहेत ''ज्यांनी राग-द्वेषादीरूप भाव व जन्ममरणाचा फेरा संपविलेला आहे असे जिनसूर्य, सर्वज्ञ प्रभू महावीर आहेत. या तीर्थंकररूपी सूर्याचा उदय झालेला आहे परंतु त्याचा प्रकाश अजून पोहोचलेला नाही, पोहोचेल हे काम गणधर करतात. याच्यामागील सायन्सच पहा. सूर्य पूर्ण प्रकाशमान असला तरीही त्याचा प्रकाश पृथ्वीपर्यंत पोहचविणारे धूलिकण हे लागतातच. जो पर्यंत गणधर तीर्थंकराच्या पसायदानाचा प्रकाश करीत नाही तोपर्यंत तीर्थंकराच्या ज्ञानाचा प्रकाश फैलत नाही, पसरत नाही.

**दुख:मुक्त स्थान-सिध्दशीला**

केशीश्रमण आता शेवटचा प्रश्न विचारीत आहेत ''खूप शारीरिक दु:ख आहे, मानसिक दु:खआहे आणि या पीडितांसाठी अशी कोणती जागा आहे की जिथे दु:खाची बाधा पोहचू शकत नाही ?'' इंद्रभूती गौतम म्हणतात ''लोकाकाशाच्या मध्यभागी ते शाश्वत स्थान आहे. सिद्धशीला या ठिकाणी पोहोचलेल्या व्यक्तिचे जन्ममरणाचे फेरे समाप्त झालेले असतात. या ठिकाणी पोहचणे खूप कठीण आहे परंतु या जागी दु;ख पीडा होत नाही, संकट त्रस्त करीत नाही.''

केशीश्रमणच्या प्रत्येक प्रश्नाला प्रज्ञाशाली, समर्पक उत्तरे देणाऱ्या इंद्रभूती गौतमांना केशीश्रमण शब्दानीच नाही, भावनेनीच नाही तर कृतीनेही वंदन नमन करतात. एक तीन ज्ञानधारीने गणधरला वंदन करणेच अत्यंत अलौकिक आहे. केशीश्रमण म्हणतात ''हे गौतम ! तुझी प्रज्ञा, तुझी बुद्धि श्रेष्ठ आहे. तू माझ्या सर्व संशयाचे निराकरण केले आहेस. हे श्रुतदेवाचे अधिपती तुला वंदन, नमस्कार आहे.'' केशीश्रमण वंदन करून भ. पार्श्वनाथांच्या चातुर्याम व्रताचा त्याग करून भ. महावीरांच्या पंच महाव्रतांचा अंगीकार करतात, त्या व्यवस्थेचा स्वीकार करतात व निघून जातात.

अत्यंत श्रद्धेने अध्यायाची आराधना करा. सखोलतेने साधना करावी. या श्रद्धेने भावनेने की भगवंता! छोटे बनून कधी कुणाशी संवाद करण्याची वेळ आली तर मी इंद्रभूती गौतमासारखेच बनावे आणि मोठे बनून चर्चा करण्याची वेळ आली तर मी केशीश्रमणांसारखे बनावे. या अध्यायातील हे दोन वाक्ये जरी आपण आपल्या जीवनात-जगण्यात जिवंत केली तरी या अध्यायाची आराधना सफल झाली असे समजावे. *(क्रमश:)* ●

## क्व्हर तपशील - मार्च २०१८

❖ **श्रवणबेळगोल महामस्तकाभिषेक**

श्रवणबेळगोल येथे भगवान बाहुबलीच्या विशाल मूर्तिवर महामस्तकाभिषेक सोहळा ७ ते २६ फेब्रुवारी २०१८ दरम्यान भव्य कार्यक्रमात संपन्न झाला.

महामस्तकाभिषेक सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा व विंध्यागिरी पहाडावर जाण्यासाठी तिसऱ्या मार्गाचे उद्घाटन १९ फेब्रुवारी २०१८ रोजी झाले. कार्यक्रमास केंद्रीय मंत्री पियुष गोयल, अनंतकुमार, राज्यपाल वजुभाईवल्ला, महोत्सव समितीच्या अध्यक्षा सरिता जैन उपस्थित होते. जगद्गुरु चारुकीर्ती भट्टारक यांच्या हस्ते श्री. मोदींचा सुवर्ण कळस, सुवर्ण ध्वज ग्रंथ देऊन सत्कार झाला. (बातमी पान १०१, लेख ९९ पान)

❖ **दीक्षा महोत्सव, केडगाव**

केडगाव, ता. दौंड जैन श्रावक संघाचा तर्फे कु. सायली नवनीतलालजी गांधी हिची दीक्षा भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. या कार्यक्रमास सुमारे ४७ साधु-संत व फार मोठा जनसमुदाय उपस्थित होता. (बातमी पान ११४)

❖ **''पेपरमिंट'' ब्रँड, पुणे – राष्ट्रीय पुरस्कार**

पुणे - लहान मुलींसाठी रेडिमेड कपड्यातील सुप्रसिध्द ब्रॅण्ड ''पेपरमिंट''ला ॲपेक्स राष्ट्रीय अवॉर्ड मिळाला आहे. क्लोथिंग मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (CMAI) यांनी मुंबई येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात श्री. संतोषजी कटारिया व श्री. राजेंद्रजी कटारिया यांनी पुरस्कार स्वीकारला.

राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल पेपरमिंटचे श्री. मिठुलालजी, श्री. संतोषजी, श्री. राजेंद्रजी, श्री. कमलेशजी व सर्व कटारिया परिवाराचे हार्दिक अभिनंदन !

❖ **एच.एन.डी. जैन बोर्डींग, पुणे**

स्व. नलीनचंद्र फुलचंद गांधी यांच्या तेविसाव्या स्मृती दिनानिमित्त शेठ हिराचंद नेमचंद दिगंबर जैन बोर्डींग येथे अनमोल पांडे या विद्यार्थ्यास डॉ. रविंद्र आणि डॉ. स्मिता कोल्हे यांच्या हस्ते 'सर्वोत्कृष्ट छात्र पुरस्कार' देण्यात आला. त्यावेळी व्यसपीठावर दै. सकाळ चे कार्यकारी संपादक नंदकुमार सुतार, बोर्डिंगचे अधिक्षक सुरेंद्र गांधी, विश्वस्त चकोर गांधी आणि सौ. अनुराधा गांधी उपस्थित होते. (बातमी पान १२५)

❖ **श्री. सुरेशराव कोते, पुणे – सन्मान**

पुणे - अकोले तालुक्याचे सुपुत्र आणि लिज्जत पापडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुरेशराव कोते यांचा भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

लेप्रसी रिहॅबीलेटेशन फौंडेशनच्या माध्यमातून श्री. सुरेशराव कोते कुष्ठरुग्णासाठी काम करत असलेल्या कामाची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात आला

❖ **ओम जय आनंद डायलेसिस सेंटर, थेरगाव**

थेरगाव, चिंचवड येथील श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स संचालित ओम जय आनंद डायलेसिस सेंटर मध्ये १००० डायलेसिस पूर्ण झाले असून हा सोहळा, थेरगाव येथील जैन स्थानकात जैन कॉन्फरन्सचे मुख्य युवा संरक्षक व मार्गदर्शक पारसजी मोदी यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून उत्साही वातावरणात पार पाडला. या वेळी या डायलेसिस सेंटरला दान देणाऱ्या व्यक्तिंचा तसेच संघपतींचा स्मृती चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात श्री. पारसजी मोदी यांच्या जन्मदिवसा निमित्त विशेष सन्मान

करण्यात आला. यावेळी मंचावर श्री. पारसजी मोदी, सौ. छाया मोदी, विलासजी लोढा, बालचंदजी खरवड, बाळासाहेब चोरडिया, भवरलालजी बोहरा, रूचिरा सुराणा, मोहनलालजी संचेती, रमणलालजी लुंकड, अविनाशजी चोरडिया, सतीशजी बनवट, डॉ. जवाहरजी भळगट, अमित सुराणा, डॉ. अशोकजी पगारिया, प्रकाश बोरा, अभयजी संचेती, सागर सांकला, बाळासाहेब धोका, नितीन चोपडा, अभय लुणावत, सुभाष ललवाणी, महेंद्र सुंदेचा मुथा इ. मान्यवर उपस्थित होते.

❖ **सुर्यदत्ता ग्रुप, पुणे – पुरस्कार वितरण**

सुर्यदत्त ग्रुपच्या विसाव्या वर्धापन दिनी सुर्यदत्त जीवन गौरव व राष्ट्रीय पुरस्काराचे वितरण भव्य कार्यक्रमात संपन्न झाले. (बातमी पान ११२)

❖ **संचेती ट्रस्ट, पुणे – प्रजासत्ताक दिन साजरा**

पुणे येथील स्व. इंदूमती बन्सीलालजी संचेती ट्रस्ट तर्फे प्रजासत्ताक दिन खडकी येथे अपंग सैनिकां समवेत साजरा करण्यात आला. खडकी येथील क्यून मेरी टेक्निकल इन्स्टिट्यूट येथे झालेल्या या कार्यक्रमास सुरवातीस अपंग सैनिकांसमवेत झेंडावंदन झाले. ट्रस्टतर्फे संगणक भेट देण्यात आला. कार्यक्रमास उपस्थित ट्रस्टचे अध्यक्ष श्री. अभयजी संचेती, श्रीमती निर्मला छाजेड यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी आनंद छाजेड, सुभाष पगारिया, अ‍ॅड गौरी भटेवरा, विजय शिंगवी, मोहन जैन, मनीष संचेती आदि उपस्थित होते.

❖ **महावीर फूड बँक, पुणे**

भ्रष्टाचार निर्मूलन समिति व महावीर फूड बँक पुणे च्या संयुक्त विद्यमाने सक्षम पुणे महानगर पालिका व अपंग कल्याणकारी संस्था वानवडी पुणे यांनी आयोजित केलेल्या दिव्यांग वधू व सामुहिक विवाह सोहळ्या साठी ११ दिव्यांग मुला-मुलींसाठी संपूर्ण संसार उपयोगी भांडी व साहीत्य असलेली संसार बादली सप्रेम भेट देण्यात आली. या वेळी कार्यक्रमाची प्रस्तावना आयोजक विजयकुमार मर्लेचा यांनी केली. सौ. प्रमीलाताई नौपतलालजी सांकला व श्री गुलाबचंदजी कवाड यांचे हस्ते साहित्य देण्यात आले.

❖ **नाशिक जिल्हा जैन सांस्कृतिक कला फाऊंडेशन**

नाशिक जिल्हा जैन सांस्कृतिक कला फाऊंडेशन तर्फे ३१ डिसें. २०१७ रोजी ''जैन सांस्कृतिक महोत्सव'' आयोजित केला गेला.

सुप्रसिद्ध सरकारी वकील अ‍ॅड. उज्वल निकम हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. तसेच जामनेर येथील ''आरोग्यदूत'' पुरस्कार विजेते श्री. प्रफुल्ल लोढा हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

अध्यक्ष मोहनलाल लोढा, कार्याध्यक्ष प्रविण खाबीया, उपाध्यक्ष मोहनलाल कटारिया, सेक्रेटरी सतिष हिरण, सतिष कोठारी आणि फाऊंडेशनचे सर्व सदस्य गत १३ वर्षापासून सांस्कृतिक महोत्सव आयोजित करून त्या माध्यमातून समाज जागृती करत आहेत. ●


**गुरु आनंद तीर्थ – चिचोंडी**

**'अक्षय तृतीया'**

**वर्षीतप पारणा महोत्सव**

**बुधवार, दि. १८ अप्रैल २०१८**

**✻ संपर्क ✻**

**गुरु आनंद फौंडेशन**

**मोबाईल : ९३७१०००४०६, ९८२२०१११९९**